# मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, अमरावती

थीम पार्क, रिद्धपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती – ४४४७०४

Email - marathibhashauni@gmail.com Website - www.mbv.ac.in


**जा.क्र. मभावि/८५८/२०२६** **दिनांक : १६/१०/२०२६**

प्रति,
मा. परीक्षा नियंत्रक,
मराठी भाषा विद्यापीठ,
रिद्धपूर, अमरावती.

**विषय :** हिवाळी-२०२६ परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे व यापूर्वी भरलेले परीक्षा शुल्क परत करण्याबाबत.

**संदर्भ :** १. शासनाच्या दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीसंदर्भातील सूचना.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून प्राप्त निर्देश.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय निर्देशांच्या अनुषंगाने हिवाळी-२०२६ परीक्षेसाठी शासनाच्या निर्देशानुसार पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून पूर्णतः सूट देण्याबाबत तसेच यापूर्वी परीक्षा शुल्क भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे शुल्क परत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

सबब, हिवाळी-२०२६ परीक्षेसाठी शासनाच्या निर्देशानुसार परीक्षा शुल्कमाफीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची पात्रता तपासून त्यांना परीक्षा शुल्कातून सूट देण्याबाबत तसेच यापूर्वी परीक्षा शुल्क जमा केले असल्यास सदर शुल्क परत करण्याबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप परीक्षा आवेदनपत्र भरलेले नाही, अशा पात्र विद्यार्थ्यांना शासनाच्या निर्देशांनुसार परीक्षा शुल्क न भरता ऑनलाइन परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत आवश्यक सूचना द्याव्यात. संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून परीक्षा आवेदनपत्रे विहित मुदतीत सत्यापित करण्यात यावीत.

सदर कार्यवाही करताना शासनाच्या लागू अटी व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे, ही बाब तातडीची असल्याने आवश्यक ती कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

(डॉ. सुबोध भांडारकर)
कुलसचिव
मराठी भाषा विद्यापीठ,
रिद्धपूर, अमरावती.